दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १११ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## कोल्हापूरात 1850 कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहरातील विविध विकासकामांना मोठी चालना मिळाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुमारे 1850 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले. यावेळी कोल्हापूर शहराच्या विकासासाठी हद्दवाढ आवश्यक असल्याचे सांगत, हद्दवाढीत समाविष्ट होणाऱ्या नागरिकांच्या अडचणी सोडवून शहराला टप्प्याटप्प्याने आवश्यक सुविधा दिल्या जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

## भारतासाठी रशियाची मोठी योजना; हिंद महासागरापर्यंत रेल्वे मार्ग उभारण्याचा विचार

**मुंबई :** भारत आणि रशियामधील व्यापार संबंध आणखी मजबूत करण्यासाठी रशिया नव्या पर्यायी मार्गांचा विचार करत आहे. रशियातून हिंद महासागरापर्यंत रेल्वे मार्ग उभारण्याची शक्यता तपासली जात असून, या माध्यमातून भारतासह आशियातील देशांशी जमिनीवरील व्यापार वाढवण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. रशियाचे उपपंतप्रधान मरात खुसनुलिन यांनी सरकारी वृत्तसंस्था TASS ला दिलेल्या मुलाखतीत याबाबत माहिती दिली.

# पावसाने खुलले म्हैसमाळचे सौंदर्य; पर्यटकांची तुफान गर्दी!

## बालाजी मंदिरातही भाविकांची मोठी गर्दी, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे मात्र गैरसोय

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** पावसाळा सुरू होताच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील निसर्गरम्य पर्यटनस्थळांना नवचैतन्य प्राप्त झाले असून, रविवारी म्हैसमाळ येथे पर्यटकांनी मोठी गर्दी केली. सलग झालेल्या पावसामुळे डोंगररांगा हिरव्यागार झाल्या असून, धुक्याची चादर, वाहणारे पाणी आणि चारही बाजूंनी पसरलेली हिरवाई यामुळे म्हैसमाळचे रूप अक्षरशः पालटले आहे. शहरासह परिसरातील नागरिकांनी रविवारी मोठ्या संख्येने म्हैसमाळ गाठत निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद लुटला.





छत्रपती संभाजीनगरपासून सुमारे ४० किलोमीटर अंतरावर असलेले म्हैसमाळ हे पावसाळ्यात पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरते. डोंगर, दऱ्या-खोऱ्या, हिरवीगार वनराई आणि आल्हाददायक वातावरण यामुळे कुटुंबासह तसेच मित्रमंडळींसोबत फिरण्यासाठी नागरिकांची येथे पसंती असते. पावसाळ्यातील हिरवाईमुळे परिसराचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत असल्याने यंदाही पर्यटकांचा ओघ वाढला आहे.

म्हैसमाळच्या निसर्गसौंदर्यासोबतच येथील प्रसिद्ध बालाजी मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. रविवारी पर्यटनासाठी आलेल्या अनेक नागरिकांनी म्हैसमाळच्या निसर्गाचा आनंद घेतल्यानंतर बालाजी मंदिरात दर्शन घेतले. त्यामुळे मंदिर परिसरातही दिवसभर भाविकांची वर्दळ पाहायला मिळाली. निसर्ग पर्यटन आणि धार्मिक पर्यटनाचा सुंदर संगम म्हैसमाळमध्ये अनुभवायला मिळत असल्याने या ठिकाणाचे महत्त्व वाढले आहे.

म्हैसमाळ परिसरात झालेल्या पावसामुळे डोंगररांगांवर सर्वत्र हिरवाई पसरली आहे. पावसाच्या सरी, धुक्याने वेढलेले डोंगर आणि थंडगार वातावरण यामुळे रविवारी येथे आलेल्या पर्यटकांना वेगळाच आनंद अनुभवायला मिळाला. अनेकांनी डोंगररांगांमध्ये फेरफटका मारत निसर्गाचा आनंद घेतला. मोबाईल कॅमेऱ्यात या निसर्गरम्य दृश्यांना टिपण्यासाठीही पर्यटकांची लगबग सुरू होती.

शहरातील दैनंदिन धावपळीतून काही तास निसर्गाच्या सान्निध्यात घालवण्यासाठी अनेक कुटुंबांनी म्हैसमाळची वाट धरली. त्यामुळे सकाळपासूनच परिसरात वाहनांची वर्दळ वाढली होती. दुपारपर्यंत पर्यटकांची संख्या आणखी वाढल्याने काही ठिकाणी वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

एकीकडे निसर्गाने म्हैसमाळला हिरवाईची सुंदर झालर चढवली असताना दुसरीकडे काही प्रमाणात रस्त्याची दुरवस्था पर्यटकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. पावसामुळे रस्त्यावर खड्डे आणि खराब झालेल्या भागामुळे वाहनचालकांना सावधपणे प्रवास करावा लागत आहे. पर्यटकांची संख्या वाढल्याने या रस्त्यावर वाहनांची गर्दी होत असून, काही ठिकाणी वाहनांच्या रांगा लागल्याने नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागले.

पावसाळ्यात पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने म्हैसमाळकडे जाणाऱ्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी पर्यटक आणि स्थानिकांकडून होत आहे. रस्ता सुस्थितीत झाल्यास पर्यटनाला आणखी चालना मिळून स्थानिक व्यवसायांनाही त्याचा फायदा होऊ शकतो.

म्हैसमाळमध्ये मंदिरांसोबतच दऱ्या-खोऱ्या, डोंगर आणि निसर्गरम्य परिसर पाहायला मिळत असल्याने पावसाळ्यात येथे पर्यटकांची विशेष गर्दी होते.

यंदाच्या पावसामुळे म्हैसमाळ परिसरातील निसर्ग अधिकच खुलला असून, रविवारी त्याची प्रचिती आली. हिरवाईने नटलेल्या डोंगररांगा आणि आल्हाददायक वातावरणामुळे छत्रपती संभाजीनगरकरांसाठी म्हैसमाळ पुन्हा एकदा ‘वीकेंड डेस्टिनेशन’ ठरले. मात्र वाढत्या पर्यटक संख्येच्या पार्श्वभूमीवर रस्ते, वाहनतळ, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांकडे प्रशासनाने अधिक लक्ष देण्याची गरज आहे. निसर्गसौंदर्याबरोबरच सुविधा सक्षम झाल्यास म्हैसमाळला मराठवाड्यातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून आणखी मोठी ओळख मिळू शकते.

## थोडक्यात वार्ता

### मुलांवर आणि पुरुषांवर लैंगिक अत्याचार करणारा तरुण अटकेत

**नंदुरबार :** नंदुरबार जिल्ह्यात गेल्या चार वर्षांपासून अल्पवयीन मुले आणि तरुण पुरुषांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या एका २२ वर्षांच्या तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या मोबाईलमध्ये तब्बल ६०० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ आणि छायाचित्रे सापडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. चेतन प्रकाश कोळी (रा. रायसिंगपुरा, नंदुरबार) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. शनिवारी भातपोरी/भोने फाटा परिसरातील एका पपईच्या शेतातून त्याला अटक करण्यात आली. आरोपी एका अल्पवयीन मुलाला फसवून तिथे घेऊन गेल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. न्यायालयाने आरोपीला १२ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. नंदुरबारच्या पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीला पकडण्यासाठी एक विशेष पथक तयार करण्यात आले होते. साध्या वेशातील पोलिसांनी परिसरावर लक्ष ठेवून आरोपीला चौफेर घेरले. त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि साक्षीदारांच्या उपस्थितीत आरोपीच्या मोबाईलची पाहणी केली असता, त्याच्या एका 'हिडन फोल्डर'मध्ये ६०० हून अधिक आक्षेपार्ह आणि लैंगिक अत्याचाराचे व्हिडिओ व फोटो आढळून आले. फॉरेन्सिक टीमने हा डिजिटल पुरावा सुरक्षित केला आहे.

### महाराष्ट्रात 13 ऑगस्टपासून पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज

**मुंबई :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने काहीशी विश्रांती घेतली असली, तरी आता पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल होत आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय होणार असून, १३ ऑगस्टपासून पावसाचा जोर प्रचंड वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः कोकण, मुंबई आणि मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्याला याचा सर्वाधिक प्रभाव जाणवू शकतो. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने जारी केलेल्या अंदाजानुसार, ९ ते १२ ऑगस्ट दरम्यान उत्तर व दक्षिण कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाच्या जोरदार सरी कोसळतील.

### पत्नी पैसे खर्च करेल म्हणून शेतात पुरले लाखो रुपये...

**राजस्थान :** राजस्थानच्या बालोत्रा जिल्ह्यातून एक अजब घटना समोर आली आहे. पत्नीपासून पैसे लपवण्याच्या प्रयत्नात एका शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसला. जमीन विकून मिळालेले तब्बल 5 लाख रुपये चोरीला जाऊ नयेत म्हणून त्याने शेतात खड्डा खोदून पुरून ठेवले. मात्र, काही काळानंतर पैसे नेमके कुठे पुरले होते, हेच तो विसरला. जवळपास वर्षभरानंतर हे पैसे सापडले, पण तोपर्यंत वाळवीने नोटांची पूर्णपणे नासधूस केली होती. बालोत्रा येथील मांगिलाल मेघवाल यांनी जमीन विकल्यानंतर त्यांना 5 लाख रुपये मिळाले होते. घरात पैसे ठेवल्यास चोरी होण्याची भीती होती. तसेच पत्नी पैसे खर्च करेल, अशीही त्यांना चिंता होती. त्यामुळे त्यांनी कोणालाही न सांगता रोकड एका पिशवीत ठेवली आणि शेतात खड्डा खोदून पुरली. जवळपास एक वर्षानंतर पावसाळ्यात शेतात पेरणी सुरू असताना अचानक जमिनीत पुरलेली पैशांची पिशवी सापडली. पिशवी उघडताच त्यामध्ये 500 रुपयांच्या नोटांचे गठ्ठे दिसले. मात्र, नोटांची अवस्था पाहून कुटुंबीयांना धक्काच बसला. वाळवीने नोटांचे मोठे नुकसान केले होते आणि अनेक नोटांचे तुकडे झाले होते.

# नोकरीची स्वप्ने दाखवून घातला घाट, भ्रष्टाचाराच्या बाजारात विद्यार्थ्यांची वाट!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डोळ्यात भविष्याची स्वप्ने, अंगात कष्टाची खाज आणि हातात पुस्तकांच्या गाठी... पण परीक्षा केंद्रावर पोहोचल्यावर जे सत्य समोर आले, त्याने सुशिक्षित तरुणांच्या विश्वासाचा अक्षरशः चुराडा केला. महिनाभर रात्रंदिवस अभ्यास करून, २५ हजार रुपयांच्या पगाराच्या एका आशेवर परीक्षा द्यायला आलेले हे तरुण, आज एका मोठ्या फसवणुकीच्या आणि भ्रष्टाचाराच्या जाळ्यात अडकल्याचे भीषण वास्तव उजेडात आले आहे.



छत्रपती संभाजीनगरमधून एका अत्यंत संतापजनक आणि तितक्याच वेदनादायी प्रकाराने सुशिक्षित बेरोजगारांच्या व्यथेची पोलखोल केली आहे. विमानतळावर आकर्षक नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका खाजगी कंपनीने महाराष्ट्रातील हजारो तरुणांची आर्थिक पिळवणूक केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. शासकीय भरतीसारखीच पारदर्शक प्रक्रिया असल्याचा देखावा निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५०० ते ७०० रुपयांची परीक्षा फी उकळण्यात आली. महिन्याला २५ हजार रुपयांचा घसघशीत पगार आणि विमानतळावरील झगमगीत नोकरीच्या या झोक्यावर स्वार होत, राज्यभरातून शेकडो विद्यार्थी ९ ऑगस्ट रोजी सकाळी शहरातील एका परीक्षा केंद्रावर पोहोचले.

परंतु, केंद्राच्या उंबरठ्यावर पाय ठेवताच या हतबल विद्यार्थ्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. महिनाभरापासून ऑनलाईन अर्ज भरून, डोळ्यात तेल घालून परीक्षेची तयारी करणाऱ्या या मुलांना तिथे कसलीही परीक्षा दिसली नाही. कंपनीने सर्व विद्यार्थ्यांना ‘संगणकीय ऑनलाईन परीक्षा’ (CSA) होणार असल्याचे सांगितले होते, मात्र प्रत्यक्षात केंद्रावर एकही संगणक उपलब्ध नव्हता. एवढेच नव्हे तर, परीक्षा घेण्यासाठी आलेली कथित ‘थर्ड पार्टी’ कंपनीही या सर्व प्रकाराबाबत अज्ञानाचा आव आणत हात वर करून बसली. "आम्हाला काहीच माहिती नाही," असे थंड शब्दांत सांगणाऱ्या या कंपनीच्या उत्तरानंतर विद्यार्थ्यांचा संयम सुटला आणि संताप अनावर झाला.

या संपूर्ण फसवणूक सत्रामुळे परीक्षा केंद्राबाहेर एकच गोंधळ उडाला. हातावर पोट असलेल्या आणि बेरोजगारीच्या जळत्या वाटेवर चालणाऱ्या या तरुण मुला-मुलींनी प्रशासनाविरोधात आणि त्या लबाड कंपनीविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या संतापजनक प्रकारची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली, मात्र या निमित्ताने सुशिक्षित बेरोजगारांच्या मजबुरीचा कसा बाजार मांडला जातोय, याचे अत्यंत विदारक चित्र पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे.

पुस्तकांवर घाम गाळायचा, पैशांची जुळवाजुळव करून अर्ज भरायचा आणि शेवटी पदरी काय पडायचे? तर फक्त फसवणुकीचा अंधार अन् डोळ्यात अश्रू! विमानतळावर नोकरीची स्वप्ने दाखवून हजारो विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा असा खेळखंडोबा मांडणाऱ्या या लबाडांवर कठोर कायदेशीर कारवाई कधी होणार? हाच प्रश्न आज रस्त्यांवरून प्रत्येक हताश विद्यार्थ्याच्या हुंदक्यातून बाहेर पडत आहे.

## अजिंठा लेणी पाहण्यासाठी आलेल्या युवकाचा वाघूर नदीपात्रात बुडून मृत्यू



हिंदू प्रकाशवार्ता / शेख हक्कानी

**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या सात युवकांपैकी एका युवकाचा वाघूर नदीपात्रातील डोहात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना रविवारी सप्तकुंडाच्या वरच्या बाजूस असलेल्या वाघूर नदीपात्रात घडली.

छत्रपती संभाजीनगर शहरातील हिनानगर, चिकलठाणा परिसरातील सात युवक अजिंठा लेणी पाहण्यासाठी आले होते. लेणी पाहिल्यानंतर ते सप्तकुंडाच्या वरच्या बाजूस वाघूर नदीपात्राजवळ गेले. नदीपात्रातील पाणी पाहून त्यांना पोहण्याचा मोह झाला. यावेळी दोन युवक पाण्यात बुडू लागले. त्यांच्या मित्रांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी एका युवकाला वाचविण्यात यश आले; मात्र अरबाज गफ्फार शहा (वय २१, रा. हिनानगर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर) हा युवक पाण्याच्या अधिक खोल भागात गेल्याने बुडाला. अरबाज पाण्यात बुडाल्याचे लक्षात येताच त्याच्या मित्रांनी आरडाओरड करण्यास सुरुवात केली. आवाज ऐकून जवळच असलेले लेणापूर येथील स्थानिक युवक घटनास्थळी धावून आले. त्यांनी नदीपात्रातील डोहातून अरबाजला बाहेर काढले.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच फर्दापूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत पाटील व पोलिस कर्मचारी संतोष उबाळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अरबाज याला तातडीने अजिंठा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरधर बोंडले यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे अजिंठा परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पर्यटनस्थळांवरील नदी, धबधबे व खोल पाण्याच्या ठिकाणी पर्यटकांनी विशेष खबरदारी घेण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

## पाकिस्तानच्या तुरुंगात 198 भारतीय मच्छीमार अद्याप बंदिस्त

**नवी दिल्ली :** भारत-पाकिस्तानच्या समुद्रसीमेवर मासेमारी करताना चुकून पाकिस्तानच्या हद्दीत गेल्याच्या आरोपावरून अनेक भारतीय मच्छीमारांना पाकिस्तानमध्ये अटक करण्यात आली आहे. त्यापैकी काहींनी शिक्षेचा कालावधी पूर्ण करूनही अद्याप मायदेशी परतण्याची वाट पाहत आहेत. त्यांच्या कुटुंबीयांसाठी मात्र ही प्रतीक्षा वर्षानुवर्षांची झाली आहे.

गुजरातमधील गीर सोमनाथ जिल्ह्यातील लेरका गावातील भावनाबेन सोलंकी यांचे पती महेशभाई सहा वर्षांपूर्वी मासेमारीसाठी समुद्रात गेले होते. घरातून निघताना त्यांनी पत्नीला, “मी मासेमारीला जातोय, परत येईन. काळजी करू नकोस,” असे सांगितले होते. मात्र त्यानंतर महेशभाई घरी परतलेच नाहीत. काही काळाने कुटुंबीयांना ते पाकिस्तानच्या ताब्यात असल्याची माहिती मिळाली. महेशभाई आणि भावनाबेन यांचे लग्न झाले तेव्हा भावनाबेन अवघ्या १७ वर्षांच्या होत्या. त्यांना दोन मुले आहेत. पतीच्या अनुपस्थितीत त्यांचा पाच महिन्यांचा मुलगा आता मोठ्या भावासोबत शाळेत जात आहे. महेशभाईंच्या आईचेही निधन झाले असून, पत्नी आणि मुले अंथरुणाला खिळलेल्या वडिलांसोबत अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहत आहेत.

## वृत्तपत्र विकून शिक्षण घेणाऱ्या आर्यनला अंबादास दानवेंची सायकलची भेट

### कष्टकरी विद्यार्थ्याच्या जिद्दीला मिळाले प्रोत्साहन; शिक्षणासोबत कुटुंबाला देतो हातभार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** नागसेननगर येथील इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेणारा आर्यन गौतम गायकवाड हा विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवत आहे. शिक्षणासोबतच तो दररोज वृत्तपत्र विक्री करून आपल्या कुटुंबाला हातभार लावत आहे. त्याच्या जिद्दीची दखल घेत शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांनी आर्यनला सायकल भेट देत त्याच्या कष्टांना प्रोत्साहन दिले.



आर्यन हा पीर बाजार, उस्मानपुरा येथील भागीरथीबाई उच्च माध्यमिक शाळेत इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत आहे. त्याची आई घरकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही आर्यनने परिस्थितीसमोर हार न मानता शिक्षणासोबत वृत्तपत्र विक्रीचे काम स्वीकारले आहे. पाऊस, थंडी किंवा कडाक्याचे ऊन असो, तो नियमितपणे वृत्तपत्र विक्री करून आईला मदतीचा हात देत आहे.

आर्यन दररोज शिवसेना नेते तथा आमदार अंबादास दानवे यांच्या क्रांती चौक येथील मातृभूमी प्रतिष्ठानच्या कार्यालयातही वृत्तपत्रे देण्यासाठी येतो. त्याची मेहनत, जिद्द आणि संघर्ष दानवे यांच्या लक्षात आला. एवढ्या लहान वयात कुटुंबासाठी कष्ट करून शिक्षण घेणाऱ्या आर्यनची परिस्थिती पाहून त्यांनी त्याला सायकल भेट देण्याचा निर्णय घेतला.

वृत्तपत्र विक्रीसाठी आर्यनला दररोज करावा लागणारा प्रवास सायकलमुळे अधिक सुलभ होणार असून त्याचा वेळ आणि श्रमही वाचणार आहेत. आर्यनच्या कष्टांचा भार काहीसा हलका करण्यासोबतच त्याच्या शिक्षणाला बळ मिळावे, या उद्देशाने ही मदत करण्यात आल्याचे अंबादास दानवे यांनी सांगितले. या मदतीमुळे आर्यनच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून त्याच्या शिक्षणाच्या प्रवासाला नवी ऊर्जा मिळाली आहे.

## "शाल जोडे"




## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात भरती प्रक्रिया वेगवान; 141 सहायक प्राध्यापकांच्या मुलाखतींना आजपासून सुरुवात

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विविध विभागांमधील रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली असून एकत्रित वेतनावर १४१ सहायक प्राध्यापक पदांच्या मुलाखतींना आजपासून (दि. १० ऑगस्ट) प्रत्यक्ष सुरुवात होत आहे. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषद कक्षात ही निवड प्रक्रिया पार पडत आहे. विद्यापीठाचा मुख्य परिसर आणि धाराशिव उपपरिसरातील १४१ सहायक प्राध्यापकांच्या जागा भरण्यासाठी ३ व ४ ऑगस्ट रोजी संगणक प्रणालीद्वारे (कम्प्युटर बेस्ड) लेखी परीक्षा घेण्यात आली होती. या १४१ जागांसाठी एकूण ४६८ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते, त्यापैकी ३९२ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. युनिकचे संचालक डॉ. प्रवीण यन्नावार व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही परीक्षा यशस्वीरीत्या पार पाडली. या लेखी परीक्षेतून निवड झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती १० ते १३ ऑगस्ट दरम्यान घेण्यात येत आहेत.

कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती ही मुलाखत घेत असून, १० ते १३ ऑगस्ट या कालावधीत दररोज एका विद्याशाखेनुसार मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार आज (१० ऑगस्ट) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, ११ ऑगस्ट रोजी मानव्य विद्याशाखा, १२ ऑगस्ट रोजी वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र, तर १३ ऑगस्ट रोजी शेवटच्या दिवशी आंतरविद्या शाखेतील उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत. संबंधित विषयांच्या मुलाखतीच्या दिवशी सर्व उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह सकाळी ९ वाजता महात्मा फुले सभागृहात उपस्थित राहण्याचे आवाहन आस्थापना विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

या मुख्य भरती प्रक्रियेसोबतच विद्यापीठांतर्गत येणाऱ्या अन्य शैक्षणिक संस्थांमधील रिक्त पदांसाठीही भरती जाहीर करण्यात आली आहे. गेल्या दहा वर्षांपासून विद्यापीठ परिसरात कार्यरत असलेल्या 'गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था' (जीएमआरआरडी) येथे चार पदव्युत्तर अभ्यासक्रमांसह विविध अभ्यासक्रम सुरू आहेत. या ठिकाणी १ लाख रुपये एकत्रित वेतनावर पूर्णवेळ संचालकाचे १ पद आणि ३२ हजार रुपये एकत्रित वेतनावर सहायक प्राध्यापकांची १२ पदे भरली जाणार आहेत. तसेच, श्रीक्षेत्र पैठण येथील संत साहित्याशी संबंधित अभ्यासक्रम सुरू असलेल्या संतपीठात सहायक प्राध्यापकांची ८ पदे भरण्यात येणार आहेत.

याशिवाय, विद्यापीठ संचलित घनसावंगी येथील मॉडेल कॉलेजमध्ये १ लाख रुपये एकत्रित वेतनावर पूर्णवेळ प्राचार्याची १ जागा भरण्यात येणार आहे. तसेच याच महाविद्यालयात हिंदी, इंग्रजी, मानसशास्त्र, वाणिज्य, संगणकशास्त्र, जैवरसायनशास्त्र व जैवतंत्रज्ञान या विभागांसाठी सहायक प्राध्यापकांची ९ पदे भरली जाणार आहेत. या सर्व पदांसाठी येत्या १४ ऑगस्ट रोजी मुलाखती होणार असून, इच्छुक उमेदवारांना १३ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज दाखल करावे लागणार आहेत. संबंधितांनी मूळ कागदपत्रे आणि अर्जाच्या दोन प्रतींसह मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांनी केले आहे.

# सं पा द की य

## कृषी आणि सहकाराला नवा दिलासा

राज्यातील बळीराजाला दिलासा देण्यासाठी आणि कृषी क्षेत्राला आधुनिकतेची जोड देण्यासाठी राज्य सरकारने आखलेली धोरणे शेती व्यवस्थेचा कायापालट करणारी ठरत आहेत. शेतकऱ्यांना ऐतिहासिक कर्जमाफी देऊन थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र देणे, सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून दिवसा मोफत वीज पुरवणे आणि साखर कारखानदारीला इथेनॉल तसेच बायोगॅसची (सीबीजी) जोड देणे, हे निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारे आहेत. कागल येथील शेतकरी मेळाव्यात जाहीर करण्यात आलेल्या या कल्याणकारी योजनांमुळे शेतकरी आणि सहकार क्षेत्रात नवचैतन्य निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीचा आणि समाजसुधारणेचा वारसा जपताना बहुजन, वंचित आणि शेतकरी वर्गाला केंद्रात ठेवून धोरणे राबवणे ही काळाची गरज आहे. शाहू महाराजांनी राधानगरी धरणाची उभारणी करून जलक्रांती घडवून आणली होती, त्याच विचारांवर चालत आज शेतकऱ्यांना विजेच्या बाबतीत आत्मनिर्भर केले जात आहे. सध्या ७४ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत असून लवकरच १०० टक्के शेतकऱ्यांना मोफत आणि अखंड वीज मिळण्याचे उद्दिष्ट गाठणे हे राज्याच्या कृषी विकासातील एक मोठे पाऊल ठरेल. साखर कारखानदारी हा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थकारणाचा मुख्य कणा आहे. मात्र, बदलत्या काळात केवळ साखरेच्या उत्पादनावर कारखाने चालवणे कठीण झाले आहे. अशा वेळी इथेनॉल निर्मिती धोरण आणि 'झिरो वेस्ट' संकल्पनेतून सीबीजी तसेच सीएनजी निर्मिती प्रकल्प उभारण्याचा निर्णय अतिशय धोरणात्मक आहे. या उपउत्पादनांमुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती मजबूत होईल आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर 'एफआरपी' देणे शक्य होईल. इथेनॉलबाबत पसरवल्या जाणाऱ्या गैरसमजांना पूर्णविराम देत कारखानदारी टिकवण्यासाठी अशा उपक्रमांना प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून त्यांना थेट शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आणि शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून त्यांचा उत्पादन खर्च कमी करणे, या दुहेरी धोरणामुळे राज्यातील कृषी क्षेत्र अधिक सक्षम होईल. सरकारची ही आश्वासने केवळ कागदावर न राहता त्यांची प्रभावी अंमलबजावणी वेळेत झाली, तरच खऱ्या अर्थाने शाहू महाराजांच्या विचारांना अभिप्रेत असलेला सुजलाम सुफलाम महाराष्ट्र घडवता येईल.

## पावसाचा थेंबथेंब साठवूया, जीवन वाचवूया : जलसाक्षरतेची लोकचळवळ उभी करूया

"पाणी आहे म्हणूनच जीवन आहे" हे वाक्य आपण अनेकदा ऐकतो; परंतु आज त्यामागील वास्तव अधिक भीषण बनत चालले आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण मोठे असले, तरी पिण्यायोग्य गोडे पाणी अत्यंत मर्यादित आहे. हवामान बदल, जंगलतोड, वाढती लोकसंख्या, बेसुमार भूजल उपसा, नद्यांचे प्रदूषण आणि पाण्याचा उधळपट्टीने होणारा वापर यामुळे जलसंकट दिवसेंदिवस तीव्र होत आहे.

आज अनेक गावे टँकरवर अवलंबून आहेत. शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पावसाच्या प्रतीक्षेचे अश्रू आहेत. शहरांत पाण्याच्या टंचाईमुळे दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे. भविष्यातील युद्धे जर झाली, तर ती पाण्यासाठी होतील, असा इशारा जगभरातील तज्ज्ञ देत आहेत. अशा वेळी केवळ जलसंवर्धनाची नव्हे, तर जलसाक्षरतेची लोकचळवळ उभारणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे.

जलसाक्षरतेची खरी सुरुवात शाळा आणि महाविद्यालयांतूनच झाली पाहिजे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यामुळे प्रत्येक शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्थेने "प्रत्येक विद्यार्थी एक जलदूत" हा संकल्प स्वीकारण्याची गरज आहे. परिसरात पाणी बचतीविषयी जनजागृती रॅली, पथनाट्य, घोषवाक्य स्पर्धा, निबंध, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, जलप्रतिज्ञा, पावसाचे पाणी साठविण्याचे प्रात्यक्षिक, जलस्रोत स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण यांसारखे उपक्रम सातत्याने राबविले पाहिजेत. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरात आणि परिसरात किमान दहा नागरिकांना पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याचा संदेश दिला, तर जलसाक्षरतेची ही चळवळ जनआंदोलनात रूपांतरित होईल. शिक्षण केवळ गुण मिळविण्यासाठी नसून समाज घडविण्यासाठी असते. म्हणूनच प्रत्येक शैक्षणिक संस्थेने जलसंवर्धनाची संस्कृती जोपासून जलसुरक्षित आणि समृद्ध भारत घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, हेच काळाचे खरे आवाहन आहे.

प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखणारा, पाण्याचा सन्मान करणारा आणि भावी पिढीसाठी जलसंपत्ती जपणारा समाज निर्माण झाला, तरच आपण सुरक्षित भविष्य घडवू शकतो.जलसाक्षरता म्हणजे फक्त पाणी वाचविण्याचे ज्ञान नव्हे; तर पाण्याचा शाश्वत, जबाबदार आणि वैज्ञानिक वापर करण्याची जीवनशैली होय. ज्या समाजाला पाण्याचे मूल्य कळते, तो समाज कधीही जलसंकटात सापडत नाही. पूर्वी आपल्या गावागावांत तलाव, विहिरी, बारव, पाझर तलाव, ओढे आणि पारंपरिक जलस्रोत जपले जात होते. प्रत्येक गावाने पाण्याचा सन्मान केला होता. पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरविण्याची संस्कृती होती. त्यामुळे दुष्काळाची झळ कमी जाणवत असे. परंतु आधुनिकतेच्या नादात आपण ही परंपरा विसरत गेलो. काँक्रीटच्या जंगलांनी जमिनीचा श्वास गुदमरला आणि पावसाचे पाणी वाहून जाऊ लागले.आज घरात नळ सुरू ठेवणे, वाहन धुताना पाण्याचा अपव्यय करणे, गळणारे नळ दुरुस्त न करणे, शेतीत अकार्यक्षम सिंचन पद्धती वापरणे, नद्यांमध्ये कचरा आणि सांडपाणी सोडणे ही केवळ चुकीची सवय नाही; तर भावी पिढीवर अन्याय आहे.

जलसाक्षरता प्रत्येक घरातून सुरू झाली पाहिजे. मुलांना लहानपणापासून पाण्याचे महत्त्व शिकवले पाहिजे. शाळांमध्ये जलसंवर्धनाचे प्रात्यक्षिक शिक्षण दिले पाहिजे. पावसाचे पाणी साठविणे, झाडे लावणे, जलस्रोत स्वच्छ ठेवणे, भूजल पुनर्भरण करणे आणि प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली पाहिजे.

शेतकऱ्यांनी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक पद्धती स्वीकारल्या, तर लाखो लिटर पाण्याची बचत होऊ शकते. उद्योगांनी पाण्याचा पुनर्वापर करणे आवश्यक आहे. शहरांनी सांडपाण्याचे शुद्धीकरण करून त्याचा पुनर्वापर केला, तर गोड्या पाण्यावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल.

जलसाक्षरतेचा विषय हा केवळ पर्यावरणाचा नाही; तो आरोग्य, शेती, अर्थव्यवस्था, शिक्षण, उद्योग, सामाजिक न्याय आणि मानवतेशी जोडलेला आहे. ज्या भागात पाणी नसते, तेथील मुलांचे शिक्षण खंडित होते. महिलांना मैलोनमैल पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागते. शेतकरी कर्जबाजारी होतो. जनावरे तहानेने व्याकूळ होतात. गावांची अर्थव्यवस्था कोलमडते. म्हणूनच पाणी वाचविणे म्हणजे संपूर्ण समाजाचे भविष्य वाचविणे होय.

आज गरज आहे ती शासनाच्या योजनांबरोबरच जनसहभागाची. जलसंधारणाचे प्रत्येक काम लोकचळवळ बनले पाहिजे. प्रत्येक गावाने "माझे गाव जलसमृद्ध गाव" हा संकल्प केला पाहिजे. प्रत्येक शाळेने "जलसाक्षर विद्यार्थी" घडविण्याचा निर्धार केला पाहिजे. प्रत्येक कुटुंबाने वर्षातून किमान एक जलसंवर्धन उपक्रम राबविला पाहिजे.

आपल्या देशातील अनेक गावांनी श्रमदान, जलसंधारण आणि सामूहिक प्रयत्नांच्या जोरावर दुष्काळावर मात केली आहे. ही प्रेरणादायी उदाहरणे सांगतात की, इच्छाशक्ती आणि लोकसहभाग असेल, तर अशक्य वाटणारे कामही शक्य होते.

आजच्या तरुणांनी सोशल मीडियावर केवळ संदेश देण्याऐवजी प्रत्यक्ष जलस्रोत स्वच्छता, वृक्षारोपण, पावसाचे पाणी साठविणे, जनजागृती रॅली, जलप्रतिज्ञा अभियान अशा उपक्रमांत सहभागी व्हावे. खरी देशभक्ती म्हणजे देशाच्या नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करणे होय.

आपण आपल्या मुलांसाठी बँकेत पैसे साठवतो, घरे बांधतो, मालमत्ता निर्माण करतो; पण त्यांच्यासाठी पाण्याचा साठा निर्माण करण्याचा विचार करतो का? उद्याच्या पिढीने जर विचारले, "आमच्यासाठी स्वच्छ पाणी का ठेवले नाही?" तर त्या प्रश्नाचे उत्तर आपल्या पिढीकडे नसेल.

म्हणूनच जलसाक्षरता ही केवळ एक मोहीम नसून जीवनाचा संस्कार बनली पाहिजे. प्रत्येक नागरिकाने "पाणी हा अधिकार आहे; पण त्याहून मोठी जबाबदारी आहे," ही भावना मनात रुजवली पाहिजे.

एका तहानलेल्या लेकराच्या हातात पाण्याचा एक घोट देताना जी माणुसकी अनुभवायला मिळते, ती कोणत्याही संपत्तीपेक्षा मोठी असते. एका शेतकऱ्याच्या कोरड्या शिवारात पाण्याचा पहिला प्रवाह पोहोचतो, तेव्हा त्याच्या डोळ्यांत उमटणारा आनंद हा निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याची जाणीव करून देतो. एखाद्या वृद्ध आईच्या ओंजळीत स्वच्छ पाणी पडते, तेव्हा तिच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान हीच खरी विकासाची व्याख्या आहे.

आज आपण पाण्याचा प्रत्येक थेंब जपला, तर उद्या आपल्या मुलांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू असतील; अन्यथा त्याच डोळ्यांत आपल्या निष्काळजीपणाबद्दलचा प्रश्न असेल. आपण आपल्या पुढील पिढीला तहान, टँकर आणि संघर्षाचा वारसा द्यायचा की हिरवागार, जलसमृद्ध आणि समृद्ध भारताचा, हा निर्णय आज आपल्या हातात आहे.

चला,आजच आपण एक छोटासा संकल्प करूया एक थेंबही वाया जाऊ देणार नाही. प्रत्येक घर जलसाक्षर करू, प्रत्येक गाव जलसमृद्ध करू, प्रत्येक मनात पाण्याविषयी कृतज्ञता जागवू.

कारण..."थेंबथेंब साठवूया, जीवन वाचवूया; जलसाक्षरतेची लोकचळवळ उभी करून, भावी पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब जपूया."

**लेखिका**
**मीरा रामदास वाघमारे**
**संचालिका माई वृद्धाश्रम**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं. 8421141104**

## लिंबूवर्गीय फळपिकांच्या संशोधन व विकासाला मिळणार नवी दिशा; मराठवाड्यातील लिंबूवर्गीय फळपिकांच्या विकासाला चालना

**हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी**

**परभणी** :-वनामकृवि, परभणी आणि भाकृअप–केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था, नागपूर यांच्यात सामंजस्य करार

लिंबूवर्गीय फळपिकांच्या क्षेत्रातील संशोधन, तंत्रज्ञान विकास, ज्ञानाची देवाणघेवाण आणि शेतकरी-केंद्रित उपक्रमांना अधिक गती देण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद–केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था (ICAR–Central Citrus Research Institute), नागपूर यांच्यात दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MoU) करण्यात आला.

या सामंजस्य करारावर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि भाकृअप–केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था, नागपूरचे माननीय संचालक डॉ. दिलीप घोष यांनी संबंधित संस्थांच्या वतीने स्वाक्षऱ्या केल्या.

या करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधन व विकास सहकार्याला संस्थात्मक स्वरूप प्राप्त होणार असून, लिंबूवर्गीय फळपिकांच्या उत्पादन, उत्पादकता, गुणवत्ता, कीड-रोग व्यवस्थापन, आधुनिक लागवड तंत्रज्ञान, गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य, पोषण व्यवस्थापन, काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि शाश्वत उत्पादन प्रणाली यांसारख्या विविध क्षेत्रांत संयुक्तपणे कार्य करण्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या सामंजस्य करारांतर्गत दोन्ही संस्थांमध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प व विकासात्मक उपक्रम राबविणे, संशोधन निष्कर्ष व तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण, अत्याधुनिक संशोधन सुविधा व तज्ज्ञ मनुष्यबळाचा परस्पर उपयोग, क्षमता विकास कार्यक्रम, प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन तसेच विद्यार्थी, संशोधक व शास्त्रज्ञांचे परस्पर शैक्षणिक व तांत्रिक संवाद वाढविण्यात येणार आहेत. तसेच लिंबूवर्गीय फळपिकांशी



संबंधित आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांपर्यंत प्रभावी प्रसार करण्यासाठी प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि विस्तार उपक्रम संयुक्तपणे राबविण्याच्या दृष्टीनेही या करारामुळे नवीन मार्ग खुले होणार आहेत.

यावेळी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सांगितले की, मराठवाड्यातील विविध भागांमध्ये लिंबू, संत्रा, मोसंबी आदी लिंबूवर्गीय फळपिकांना मोठी क्षमता असून, हवामानातील बदल, अनियमित पर्जन्यमान, पाणीटंचाई, कीड-रोगांचा प्रादुर्भाव, उत्पादन खर्चातील वाढ आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनाची गरज यांसारख्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर आधुनिक व शाश्वत तंत्रज्ञानाची आवश्यकता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सदर सामंजस्य करार मराठवाड्यातील लिंबूवर्गीय फळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष महत्त्वाचा ठरणार आहे.

यासाठी दोन्ही संस्थांकडे उपलब्ध असलेली तज्ज्ञता, संशोधन सुविधा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ यांचा परस्पर समन्वय साधल्यामुळे लिंबूवर्गीय फळपिकांवरील संशोधनाला निश्चितच नवी दिशा मिळेल. संशोधनातून विकसित होणारे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्यातून उत्पादन, उत्पादकता व गुणवत्तेत वाढ घडवून आणणे हा या सहकार्याचा महत्त्वाचा उद्देश आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर कमी पाण्यात अधिक उत्पादन, संसाधनांचा कार्यक्षम वापर, शाश्वत बाग व्यवस्थापन आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे आवश्यक आहे. या दृष्टीने केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था, नागपूर यांच्यासोबतचे सहकार्य विद्यापीठाच्या संशोधन व विस्तार कार्याला अधिक बळकटी देणारे ठरेल.

शेतकरी, विद्यार्थी व संशोधकांना थेट लाभ

या सामंजस्य कराराचा लाभ लिंबूवर्गीय फळ उत्पादक शेतकरी, विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक, शास्त्रज्ञ आणि विस्तार कार्यकर्ते यांना होणार आहे. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक संशोधनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळण्याबरोबरच संशोधकांना राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची आणि संयुक्त संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

दोन्ही संस्थांच्या परस्पर सहकार्यामुळे नवीन संशोधन संकल्पना, तंत्रज्ञान निर्मिती, ज्ञानाचा प्रसार, कौशल्य विकास आणि शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचे हस्तांतरण यांना निश्चितच चालना मिळेल. विशेषतः लिंबूवर्गीय फळपिकांच्या शाश्वत व हवामान-सक्षम उत्पादन प्रणाली विकसित करण्यासाठी हे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या सामंजस्य करारामुळे संशोधनातून तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीकडे जाणाऱ्या प्रक्रियेला अधिक गती मिळणार असून, लिंबूवर्गीय फळपिकांच्या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी हे सहकार्य एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी पाऊल ठरणार आहे.

या कराराची संपूर्ण प्रक्रिया नागपूर येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद–केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था येथे पार पडली. यावेळी माननीय कुलगुरूंचे विशेष कार्यासन अधिकारी तथा कृषि रसायन व मृदा शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हरिहर कौसडीकर, तसेच केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेचे शास्त्रज्ञ व अधिकारी उपस्थित होते.

## ‘मराठवाडा भूषण’ पुरस्काराने राधा किशन पठाडे सन्मानित



**छत्रपती संभाजीनगर** : मराठवाड्याच्या मातीशी असलेले नाते, जनतेच्या प्रश्नांसाठी केलेले कार्य आणि मराठवाड्याच्या विकासासाठी तसेच लोकहितासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने ‘मराठवाडा भूषण’ पुरस्काराने पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राधा किशन पठाडे यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी विभागीय आयुक्त श्री. जी श्रीकांत यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना पठाडे म्हणाले, हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा, अभिमानाचा आणि त्याचबरोबर मोठी जबाबदारी देणारा क्षण आहे. जनतेचा विश्वास आणि समाजासाठी काम करण्याची संधी हीच माझी खरी ताकद आहे. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी, सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी यापुढेही अधिक जोमाने, प्रामाणिकपणे आणि निष्ठेने कार्य करण्याची प्रेरणा या पुरस्कारातून मिळाली आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्या कार्याची केवळ पोचपावती नाही, तर आगामी काळात अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा आणि जबाबदारी आहे.

## खाकीचा अपमान दीपके यांना भोवणार, माफी न मागितल्यास छत्रपती संभाजीनगर मध्ये चक्काजाम होणार!

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर** : विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आणि ज्वलंत प्रश्नांवर नेहमीच प्रशासनाशी दोन हात करणारे, नीट पेपरफुटी प्रकरणी देशभरात तरुणांचा बुलंद आवाज ठरलेले 'कॉक्रोच जनता पार्टी' (CJP) चे संस्थापक अभिजीत दीपके आता एका अत्यंत गंभीर आणि नव्या वादात अडकले आहेत. स्वतःच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या खाकी वर्दीतील एका कर्तव्यकठोर अधिकाऱ्याला अपमानास्पद वागणूक दिल्याचा प्रकार समोर आल्याने, आता संपूर्ण पोलीस दल आणि 'पोलिस बॉईज संघटना' आक्रमक झाली असून, या वादानं बीडच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या आंदोलनांमुळे चर्चेत असलेले अभिजीत दीपके सध्या एका मोठ्या संकटात सापडले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अवघ्या एक-दोन दिवसांपूर्वी दीपके यांच्या निवासस्थानाबाहेर त्यांच्याच सुरक्षेसाठी नेमलेल्या एका पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याशी त्यांनी अत्यंत उद्धट वर्तन केले. ड्युटीवर प्रामाणिकपणे उभे असलेल्या त्या अधिकाऱ्याला त्याचे नाव आणि पद विचारत अरेरावीची भाषा वापरण्यात आली, एवढेच नव्हे तर त्याला स्वतःच्या घराच्या आवारातून थेट बाहेर जाण्यास फर्मावण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरल्यानंतर खाकी वर्तुळात प्रचंड संताप उसळला आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत 'पोलिस बॉईज संघटना' आता थेट रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहे. संघटनेचे विद्यमान अध्यक्ष राहुल दुबाले यांनी या प्रकरणावर अत्यंत कडक भूमिका घेत दीपके यांना उघडउघड इशारा दिला आहे. संबंधित अधिकारी केवळ अभिजीत दीपके यांच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडत होता, अशा कर्तव्यदक्ष शासकीय अधिकाऱ्याला घराबाहेर काढून जाहीर अपमान करणे अत्यंत निषेधार्ह आहे, असे दुबाले यांनी स्पष्ट केले. संघटनेने अत्यंत आक्रमक पवित्रा घेत येत्या सोमवारपर्यंत संबंधित अधिकाऱ्याचे पाय धरून जाहीर माफी मागण्याची मागणी केली आहे. जर दिलेल्या मुदतीत माफी मागितली नाही, तर पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर तीव्र लोकशाही मार्गाने भव्य चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, संबंधित नेत्याचे पोलीस संरक्षण तात्काळ काढून घेण्याची मागणीही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली जाणार आहे. हा वाद केवळ एका अपमानापुरता न जुमानता आणखी चिघळला आहे. अध्यक्ष राहुल दुबाले यांनी दावा केला आहे कि, या वादानंतर CJP च्या एका अज्ञात कार्यकर्त्याकडून त्यांना फोनवरून थेट धमकी देण्याचा प्रयत्न झाला. परंतु, अशा दबावाला न जुमानता आपण शांतपणे समजून सांगत अपमानित अधिकाऱ्याची माफी मागण्याची आपली एकमेव अट कायम ठेवल्याचे त्यांनी सांगितले. आपला महाराष्ट्र हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांवर चालणारा असून आपले रक्षण करणाऱ्यांचा सन्मान येथे नेहमीच केला गेला पाहिजे. दिल्लीतल्या पोलिसांसारखी वागणूक इथे चालणार नाही, इथले पोलीस कोणापेक्षाही कमी नाहीत, असा सणसणीत टोलाही त्यांनी लगावला आहे.

## भारताने श्रीलंकेविरुद्धचा सराव सामना 6 विकेट्सने जिंकला

**कोलंबो** : यशस्वी जैस्वालच्या ६१ धावा आणि वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजच्या स्फोटक फलंदाजीने भारताने सराव सामन्याच्या तिसऱ्या आणि अंतिम दिवशी श्रीलंका इलेव्हनला सहा गडी राखून पराभूत केले. सिराजने शेवटच्या षटकात सलग तीन षटकार मारून भारताला शानदार विजय मिळवून दिला. श्रीलंका क्रिकेट इलेव्हनने आपला दुसरा डाव २००/६ धावांवर घोषित केला आणि भारतासमोर २०७ धावांचे लक्ष्य ठेवले. भारताला शेवटच्या दोन षटकांत २३ धावांची गरज होती. सिराजने १५ चेंडूंमध्ये नाबाद ३२ धावा करून हे लक्ष्य केवळ ४५ षटकांत पूर्ण केले.

विजय मिळवण्यासाठी भारताला शेवटच्या दोन षटकांत वेगाने धावा करणे आवश्यक होते. सिराजने ४४ व्या षटकात सोनल दिनुशाच्या गोलंदाजीवर षटकार मारला. त्यानंतर त्याने ४५ व्या आणि शेवटच्या षटकात केसरा नुवान्थाविरुद्ध सलग तीन चेंडूंवर तीन षटकार मारून सामना संपवला. सिराजने विविध दिशांना शानदार फटके मारून तीन चेंडू शिल्लक असताना भारताला विजय मिळवून दिला.

सराव सामन्याच्या शेवटच्या दिवशी भारतीय कर्णधार शुभमन गिलचे मैदानावर पुनरागमन हे संघासाठी एक दिलासादायक बाब होती. गुरुवारी सराव सत्रादरम्यान उजव्या हाताच्या अनामिकेला दुखापत झाल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून गिलने पहिले दोन दिवस मैदानाबाहेर घालवले होते.

दुसऱ्या डावात यशस्वी जैस्वालसोबत डावाची सुरुवात करताना गिलने ४४ धावा केल्या. फिरकी गोलंदाजांविरुद्ध त्याचे फूटवर्क प्रभावी होते, पण रमेश मेंडिसच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो फाइन लेगला झेलबाद झाला. पहिल्या डावात खाते उघडण्यात अपयशी ठरलेल्या जैस्वालने दुसऱ्या डावात ६१ धावा करून शानदार पुनरागमन केले.



ऋषभ पंतने ६८ चेंडूंमध्ये एक चौकार आणि तीन षटकारांसह २८ धावा केल्या. यापूर्वी पहिल्या डावात तो केवळ दोन धावांवर बाद झाला होता. ध्रुव जुरेल १२ धावांवर विश्व फर्नांडोच्या गोलंदाजीवर यष्टीरक्षकाच्या हाती झेलबाद झाला. रवींद्र जडेजाने आपला प्रभावी फॉर्म कायम ठेवत दुसऱ्या डावात वेगवान २२ धावा केल्या. यापूर्वी त्याने पहिल्या डावात ६३ धावा केल्या होत्या. मानव सुथार, गुरनूर ब्रार आणि सारांश जैन यांनाही फलंदाजीची संधी मिळाली.

तत्पूर्वी, भारताने आपला पहिला डाव ३५७/६ धावांवर घोषित केला. श्रीलंका इलेव्हनने दुसऱ्या डावात फलंदाजीला सुरुवात केली, तेव्हा ढगाळ हवामानातील सुरुवातीच्या ओलाव्याचा भारतीय वेगवान गोलंदाजांना फायदा झाला. मोहम्मद सिराजने रविंदू रसंथाला बाद करून संघाला सुरुवातीचे यश मिळवून दिले. प्रसिद्ध कृष्णाने आक्रमक गोलंदाजी करत पसिंदू सुरियाबंदरला त्रिफळाचीत केले. गुरनूर ब्रारने आपल्या अतिरिक्त उसळीने प्रभावित केले. त्याने पवन रत्नायके आणि कर्णधार सोनल दिनुशा यांना बाद करत ३७ धावांत दोन बळी मिळवले. रवींद्र जडेजानेही दोन बळी घेतले, ज्यात ४६ धावा करणाऱ्या निपुण धनंजयाचा समावेश होता. श्रीलंका इलेव्हनकडून, निशन मदुष्काने दुसऱ्या डावात ७३ चेंडूंमध्ये ६३ धावा करत शानदार फलंदाजी केली. हे त्याचे सामन्यातील दुसरे अर्धशतक होते. श्रीलंका इलेव्हनने ४५ षटकांत २००/६ धावांवर आपला डाव घोषित केला होता.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# जटवाडा रोड येथे गावठी पिस्तूल बाळगणारे चार जण जाळ्यात

## 1 लाख 82 हजारांचा मुद्देमाल जप्त



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गुन्हे शाखेने एका कारवाईत गावठी पिस्तूल आणि जिवंत काडतुसांसह चार जणांना जेरबंद केले आहे. शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणाऱ्या गुन्हे शाखेच्या पथकाने ही धडक कारवाई केली असून, आरोपींकडून तब्बल १ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा यांनी दिलेल्या माहितीनुसार ०७ ऑगस्ट रोजी दुपारी २.५० वाजण्याच्या दरम्यान जटवाडा रोड परिसरातील सईदा कॉलनी, आनंद क्लीनिकजवळ ही कारवाई करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अर्जुन कदम व त्यांचे पथक पोलीस आयुक्तालय हद्दीत गस्त घालत असताना, त्यांना गुप्त बातमीदारांमार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, जटवाडा रोड परिसरात काही इसम पिस्तूल विक्रीसाठी येणार आहेत. मिळालेली माहिती तत्काळ वरिष्ठांना कळवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सदर ठिकाणी सापळा रचला. पंचांसमक्ष कारवाई करत पोलिसांनी संशयित आरोपींना ताब्यात घेतले.

**आरोपी :** १) शेख शकील शेख नाजीम, वय १९ वर्ष, रा. सईदा कॉलनी, जटवाडा रोड, छत्रपती संभाजीनगर. २) सय्यद अल्फाज सय्यद अहमद, वय २१ वर्ष, रा. आलमगीर कॉलनी, जटवाडा रोड, छत्रपती संभाजीनगर. ३) शेख अबू नासेर शेख रशिद, वय २७ वर्ष, रा. आनंद मेडीकलची गल्ली, सईदा कॉलनी, जटवाडा रोड, छत्रपती संभाजीनगर. ४) उमर दुर्राणी जिया दुर्राणी, वय २५ वर्ष, रा. गल्ली नं. ०१, पिलीकॉलनी, चंपाचौक, छत्रपती संभाजीनगर. या चारही आरोपींना पोलिसांनी अटक केले आहे.

पोलिसांनी सुरुवातीला आरोपी शेख शकील शेख नाजीम याची झडती घेतली असता, त्याच्याकडे एक देशी बनावटीचे अग्नि शस्त्र (पिस्तूल) आणि ०२ जिवंत काडतुसे मिळून आली. पोलिसांनी माल जप्त करून कसून चौकशी केली असता, त्याने हे पिस्तूल व काडतुसे आपले अन्य साथीदार शेख अबू नासेर शेख रशिद आणि उमर दुर्राणी जिया दुर्राणी यांनी विक्रीसाठी दिल्याची माहिती दिली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी चौघांनाही ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली. या गुन्ह्यामध्ये चारी आरोपींचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांच्याकडून एकूण १ लाख ८२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस ठाणे बेगमपुरा येथे कलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा तसेच म.पो.अधि. कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची यशस्वी कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर, पोउपनि,अर्जुन कदम, राजेंद्र साळुंखे, योगेश गुप्ता, श्रीकांत काळे, मनोहर गिते, मनोहर त्रिभुवन,विक्रम खंडागळे आणि शिनगारे यांनी पार पाडली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

# पावसाच्या सरींना न जुमानता परभणीची "एसआयआर" मध्ये भरारी! मराठवाड्यात प्रथम; राज्यात द्वितीय, तर नागरी भागात राज्यात प्रथम

## विशेष सखोल पुनरिक्षणाचे संगणकीकरण 100 टक्के पूर्ण; एकजुटीच्या प्रयत्नांनी लक्ष्य गाठले आणि परभणीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला!

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी,:-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमात परभणी जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे.

विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेतील संगणकीकरणाचे काम 100 टक्के पूर्ण करत परभणी जिल्ह्याने मराठवाडा विभागात प्रथम, तर राज्यात एकूण कामगिरीत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, परभणी जिल्ह्यात महानगरपालिका क्षेत्राचा समावेश असतानाही नागरी भागाचा विचार करता परभणी जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर राहिला आहे. राज्यातील एकूण क्रमवारीत रत्नागिरी जिल्ह्याने प्रथम क्रमांक मिळविला असून, रत्नागिरी हा प्रामुख्याने ग्रामीण स्वरूपाचा जिल्हा आहे. पावसाळ्याच्या प्रतिकूल परिस्थितीतही अधिकारी, कर्मचारी आणि बीएलओ यांच्या अथक परिश्रमातून परभणीने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे.

**जिल्हाधिकारी यांच्या सातत्यपूर्ण पर्यवेक्षणातून कामाला गती :** या यशामागे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांचे प्रभावी नियोजन, सातत्यपूर्ण पर्यवेक्षण, नियमित आढावा आणि मार्गदर्शन निर्णायक ठरले. जिल्ह्यातील एसआयआर प्रक्रियेला अपेक्षित गती मिळावी आणि निर्धारित उद्दिष्ट वेळेत साध्य व्हावे, यासाठी माननीय जिल्हाधिकारी महोदयांनी दररोज सायंकाळी ७ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांचा वैयक्तिकरीत्या आढावा घेतला.

या आढाव्यादरम्यान विधानसभा मतदारसंघनिहाय प्रगती, प्रलंबित कामकाज, तांत्रिक अडचणी तसेच अपेक्षित कार्यवाही यांचा सविस्तर आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. या सातत्यपूर्ण आणि परिणामाभिमुख पर्यवेक्षणाला सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आपल्या कार्यक्षेत्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांशी प्रभावी समन्वय साधला आणि कामाला अपेक्षित गती दिली.

जिल्हास्तरावरून करण्यात आलेल्या या नियमित व वैयक्तिक पर्यवेक्षणामुळे क्षेत्रीय यंत्रणेतील समन्वय अधिक बळकट झाला. प्रलंबित कामांचे सातत्याने परीक्षण, अडचणींचे तातडीने निराकरण आणि क्षेत्रीय यंत्रणेला वेळोवेळी दिलेले मार्गदर्शन यामुळे एसआयआर प्रक्रियेतील संगणकीकरणाचे काम निर्धारित उद्दिष्टानुसार 100 टक्के पूर्ण करण्यास निर्णायक मदत झाली.

**तांत्रिक मार्गदर्शनातून प्रक्रियेला बळ :** उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रक्रियेच्या बारकाव्यांबाबत अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन केले. एसआयआर प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक बाबींचे निराकरण, क्षेत्रीय यंत्रणेशी सातत्यपूर्ण समन्वय आणि कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात त्यांच्या मार्गदर्शनाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली.

**विधानसभा मतदारसंघ निहाय सूक्ष्म नियोजन :** क्षेत्रीय स्तरावर उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी उदयसिंह भोसले (परभणी), शैलेश लाहोटी (सेलू), संगीता चव्हाण (पाथरी) आणि जीवराज डापकर (गंगाखेड) यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सूक्ष्म नियोजन, नियमित आढावा आणि प्रभावी समन्वयाच्या माध्यमातून एसआयआर कामाला गती दिली. विधानसभा मतदारसंघनिहाय प्रलंबित बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. त्यामुळे अंतिम टप्प्यातील कामकाजात सातत्य आणि गतिमानता कायम राहिली.

**पावसातही थांबले नाही पाऊल :** एसआयआर प्रक्रियेच्या या यशात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली ती बीएलओ आणि क्षेत्रीय स्तरावरील कर्मचाऱ्यांनी. पावसाळ्याचे दिवस, ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थिती, वाहतुकीच्या अडचणी आणि नागरिकांपर्यंत पोहोचण्यातील आव्हाने असतानाही बीएलओ यांनी घरोघरी भेटी देत, नागरिकांशी संवाद साधत आणि आवश्यक माहिती संकलित करत आपली जबाबदारी अत्यंत कर्तव्यनिष्ठेने पार पाडली.

मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल, पोलीस पाटील, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका तसेच इतर विभागांतील क्षेत्रीय कर्मचारी यांनीही या मोहिमेत मोलाची साथ दिली. "निवडणूक ही केवळ निवडणूक विभागाची जबाबदारी नसून ती लोकशाहीची सामूहिक जबाबदारी आहे," या भावनेतून विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांनी एसआयआर मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला.

तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच तहसील कार्यालयातील निवडणूक विषयक कामकाजाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही नियमित प्रशासकीय कामकाजासोबत SIR प्रक्रियेला प्राधान्य दिले. वेळेची तमा न बाळगता, सुट्ट्या तसेच नियमित कार्यालयीन वेळेच्या पलीकडेही काम करत या मोहिमेला अपेक्षित गती देण्यात आली.

**सामूहिक प्रयत्नांना यशाची मोहोर :** परभणी जिल्ह्याची ही कामगिरी कोणत्याही एका अधिकारी किंवा विभागाची नसून जिल्हा प्रशासन, निवडणूक यंत्रणा, महसूल यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी, विविध विभागांचे क्षेत्रीय कर्मचारी आणि हजारो बीएलओ यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे.

# जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर युवकांनी व्यसनाला श्रद्धांजली द्यावी - डॉ.सचिन साबळे



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.९ ऑगस्ट :** जीवनामध्ये सर्व क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर युवकांनी वाईट व्यसनाला कायमस्वरूपी श्रद्धांजली देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ.सचिन साबळे यांनी संत ज्ञानेश्वर महाविद्यालय येथे केले आहे.भारत सरकारच्या नशा मुक्ती अभियान अंतर्गत सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय येथे व्यसनमुक्तीपर अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी मातोश्री गयाबाई साबळे प्रतिष्ठानचे संचालक डॉ.सचिन साबळे यांनी सांगितले की युवकांमध्ये प्रचंड व्यसनधीनतेचे प्रमाण वाढलेले असून व्यसनाच्या आहारी युवक गेल्यामुळे निरोगी शरीराच्या संपत्तीचा नाश होत असून युवकांना जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर व्यसनाला कायमस्वरूपी श्रद्धांजली देणे ही काळाची गरज असल्याचे म्हटले आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.शिरीष पवार उपस्थित होते.प्रा.डॉ.उल्हास पाटील यांनी यावेळी व्यसनमुक्ती बद्दल युवकांना मार्गदर्शन केले. समाज प्रबोधनकार तथा महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्राप्त विष्णू मापारी यांनी सांगितले की भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय तसेच गृह मंत्रालयाच्या नारकोटेक्स कंट्रोल ब्युरो (NCB) यांच्या सहकार्याने देशभर नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात येत असून समाजात व्यसनमुक्ती बाबत व्यापक जनजागृती निर्माण करणे युवकांना सकारात्मक व मूल्याधिष्ठित जीवनशैलीकडे प्रेरित करणे आणि नशा मुक्त भारत सशक्त भारत हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.युवकांशी बोलताना त्यांनी युवकांना व्यसनाचे दुष्परिणाम सांगुन व नशा मुक्तिचे महत्त्व अनेक उदाहरणासह पटवून दिले.युवकांनी विद्यार्थिनींनी त्यांचे विचाराचे टाळ्या वाजवून स्वागत केले.प्रा.अनिल मानकर यांनी उत्कृष्टपणे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.प्रमुख अतिथी म्हणून समाजसेवक पंडित शिरसाट,आरोग्य दूत दिगंबर वाघ उपस्थित होते.यावेळी सर्व पाहुण्यांचा प्राचार्य शिरीष पवार,प्रा.डॉ.उल्हास पाटील,प्रा. डॉ.सुभाष पाटील,प्रा. रवींद्र जाधव यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.शेवटी नशा मुक्ती बाबत प्रतिज्ञा घेण्यात आली.या कार्यक्रमास प्रा.उल्हास पाटील कनिष्ठ विभाग प्रमुख,डॉ. सुभाष पाटील,प्रा.रवींद्र जाधव,प्रा. अनिल मानकर,प्रा. तौफिक शेख,प्रा.भारती पाटील,प्रा.स्वाती चव्हाण,प्रा. अश्विनी काळे,प्रा.योगेश काळे,प्रा.दीपक कल्याणकर, यांचेसह सर्व कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला.

# ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेतील बाधित 35 शेतकऱ्यांना मोबदल्याचे धनादेश वितरित



**छत्रपती संभाजीनगर :** ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेच्या बंद नलिका वितरण प्रणालीच्या कामामुळे बाधित झालेल्या ३५ शेतकऱ्यांना त्यांच्या फळबागांच्या कृषी मूल्यांकनानुसार मोबदल्याचे धनादेश आमदार विलास भुमरे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. खादगाव, सुलतानपूर, सोनवडी, गाव तांडा, खेर्डा, मोती तांडा, दावरवाडी आदी गावांतील शेतकऱ्यांच्या फळबागांचे कृषी विभागामार्फत मूल्यांकन करण्यात आले होते. या शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीचा योग्य मोबदला मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर या प्रयत्नांना यश मिळाले असून, शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीपथावर असून, या प्रकल्पामुळे परिसरातील शेतीला शाश्वत पाण्याची सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. सिंचनाची उपलब्धता वाढल्याने शेती अधिक समृद्ध होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीलाही चालना मिळणार आहे. असे त्यांनी सांगितले. विकासकामे करताना केवळ प्रकल्प पूर्ण करणे महत्त्वाचे नसून, या विकासाचा परिणाम ज्यांच्या जीवनावर होतो, त्या शेतकऱ्यांच्या हिताची काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे. आज मिळालेला मोबदला हा केवळ धनादेश नसून, शेतकऱ्यांच्या हक्कांना मिळालेली मान्यता आणि त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीच्या दिशेने पडलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

# कै. छगन आप्पा जाधव यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त विविध कार्यक्रम



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी व वीर वारकरी सेवा संघ- राष्ट्रजन फाउंडेशन परभणी च्या वतीने परभणी जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक गोभक्त कै. छगन आप्पा जाधव यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त प्रतिमेचे पूजन अभिवादन तसेच श्री विष्णुसहस्त्रनाम पारायण व्याख्यान आणि रुग्णांना रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान फळ वाटप दिनांक 9 ऑगस्ट 2026 रोजी सिविल हॉस्पिटल येथील राम कृष्ण हरी अन्नदान छात्रालय येथे रुग्णांना रुग्णांच्या नातेवाईकांना फळा अन्नदान वाटप तसेच विठ्ठल रुक्मिणी मंदिर वृंदावन कॉलनी येथे श्री विष्णुसहस्त्रनाम पारायण सोहळ्यामध्ये भाविक भक्तांना फराळ वाटप आणि व्याख्याते प्राध्यापक महेश देशमुख सर यांनी हितगुज केले तसेच श्री महालक्ष्मी मंदिर स्नेह नगर येथील ज्ञानेश्वरी पारायण मध्ये पारायण करताना फराळ वाटप यावेळी राम कृष्ण हरी अन्नदान छत्रालयाचे अध्यक्ष हभप गोविंद महाराज पौढे, विष्णुसहस्त्रनाम उपासना मंडळाचे श्री ह भ प सुरेश महाराज धावरकर ,ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मंडळाचे ह भ प बालाजी महाराज तुंगेनवार आणि संयोजक कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी चे अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर, रुद्राक्ष आवटे रितेश आवटे यांच्यासह जाधव परिवार उपस्थित होते इतर खर्च टाळून पुण्यस्मरण हे धार्मिक अध्यात्मिक सामाजिक रुग्णांच्या रुग्णांच्या नातेवाईकांच्या इतर उपक्रमातून सेवेसाठी खर्च केला पाहिजे हेच खरे श्रद्धांजली होय अशी माहिती वीर वारकरी सेवा संघ परभणी प्रदेशाध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उरण मधील नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने, शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे यांच्या आदेशाने तसेच शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद दादा भोईर मार्गदर्शनानुसार जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी उरण शहर संघटक पदी विजय दिलीप जाधव, उपशहरप्रमुख पदी फते खान सोंडे व युवतीसेना उरण तालुका संघटिका पदी कु. नेहा रुपेश भगत यांच्या नियुक्त्या जाहीर केले आहेत.

शिवसेना उरण शहर शहराच्या वतीने आयोजित जाहीर कार्यक्रमांमध्ये ज्येष्ठ शिवसेना नेते आमदार भास्करराव जाधव यांच्या शुभहस्ते हे नियुक्त पत्र देऊन या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे, तसेच जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी नियुक्ती पत्रात संघटना बांधणीसाठी व पक्ष वाढवण्यासाठी जोमाने कामाला लागा अशा शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी महिला जिल्हा संघटिका सुवर्णा जोशी, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, तालुका संपर्कप्रमुख दीपक भोईर, शहर प्रमुख विनोद म्हात्रे, शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे,शिवसेना ग्राहक कक्ष प्रमुख उरण शहर - संदीप जाधव,उपजिल्हा संघटिका ममता पाटील, तालुका संघटिका भावना म्हात्रे,पदाधिकारी, महिला आघाडी व कार्यकर्ते उपस्थित होते.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्वच स्तरातून स्वागत करण्यात येत असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कोकण ग्रुप तर्फेही त्यांना शुभेच्छा देण्यात आले आहेत.

**उरण शहर संघटक पदी विजय दिलीप जाधव, उपशहरप्रमुख पदी फते खान सोंडे व युवती सेना उरण तालुका संघटिका पदी कु. नेहा रुपेश भगत यांची नियुक्ती.**

# हल्ला झालेला मनपा कर्मचारी धीरज परदेशी यांचा उपचारादरम्यान मृत्यू, शहरात सर्वत्र तणाव

## संपूर्ण बाजारपेठ बंद, पोलिसांकडून शांततेचे आवाहन

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महापालिकेचे कंत्राटी कर्मचारी मुकुंदनगर परिसरात पोल टाकण्याचे काम करीत असताना परिसरातील सात ते आठ जणांच्या टोळक्याने हल्ला केलेले धीरज कचरूसिंग रजपूत (परदेशी) (रा. माधवबाग, भिंगार) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी( पीएम )घाटी रुग्णालयात पाठविण्यात आला. पीएम नंतर मृतदेह नगरला आणल्यानंतर येथील आमरधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.या घटनेमुळे शहरात तणाव निर्माण झाला असून हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. पोलिसांनी शहरात बदोबस्त वाढविला आहे. वेगवेगळ्या अफ़वामुळे पळापळ झाली होती. पोलिसांनी, नागरिकांनी अफ़वावर विश्वास ठेऊ नये. कायदा कोणी हातात घेऊ नये, शहरातील शांतता बिघडवीणाऱ्याची गय केली जाणार नाही, पोलीस या घटनेमागील मुख्य कारण शोधून मुळाशी जावून तपास करणार असे पोलीस अधिक्षक सुदर्शन यांनी सांगितले. . शुक्रवारी दुपारी घडलेल्या घटनेची रात्री साडे तीन वाजता भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आरोपी मेहराज अस्लम सय्यद, सिराज अस्लम सय्यद, मुस्तकिम अस्लम सय्यद, युनुस शेख आणि इतर दोन ते तीन अनोळखी इसमांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०९ (१), १८९(२), १९०, १९१(२) (३) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला होता.

# ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**बिडकीन प्रतिनिधी :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे शिक्षक प्रकाश करोडीवाल यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. क्रांती दिनाचे महत्त्व, स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचे योगदान तसेच देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्यागाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी क्रांती दिनाच्या अनुषंगाने भाषणे करून महापुरुषांच्या कार्याची माहिती उपस्थितांना दिली. देशभक्तीपर वातावरणात झालेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम व राष्ट्रभक्तीची भावना वृद्धिंगत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी गटाची वनामकृविमध्ये भेट; कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्याशी साधला संवाद



हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :-**बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्याच्या मौजे खैरा या गावातील प्रगतशील शेतकरी गटाने दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे भेट देऊन विद्यापीठातील विविध कृषि तंत्रज्ञानाची माहिती घेतली. या शेतकरी गटाने सकाळी सुरवातीला माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांची भेट घेतली.

**यावेळी माननीय कुलगुरूंनी 'शेतकरी देवो भव:'** या भावनेतून शेतकऱ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या शेतीतील अनुभव, अडचणी, पिकांची स्थिती तसेच विद्यापीठाकडून अपेक्षित असलेल्या तंत्रज्ञान व मार्गदर्शनाबाबत चर्चा केली. शेतकऱ्यांनीही आपल्या भागातील शेतीविषयक विविध प्रश्न माननीय कुलगुरूंसमोर मांडले. शेतकरी आणि विद्यापीठ यांच्यातील थेट संवादातून कृषि संशोधनाचा प्रत्यक्ष शेतापर्यंत उपयोग व्हावा, यावर यावेळी भर देण्यात आला.

शेतकरी हा कृषि विद्यापीठाच्या कार्याचा केंद्रबिंदू असून, विद्यापीठातील संशोधन व तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले पाहिजे, या भावनेतून माननीय कुलगुरूंनी शेतकऱ्यांशी केलेला हा संवाद विशेष ठरला. शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधण्याचा व त्यांच्या प्रश्नांना जाणून घेण्याचा आनंद झाल्याची भावना माननीय कुलगुरूंनी व्यक्त केली.

यानंतर शेतकरी गटास कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या विस्तार शिक्षण गटामार्फत विद्यापीठात विकसित करण्यात आलेले विविध शेतकरी उपयोगी तंत्रज्ञान, संशोधन केंद्रांमार्फत विकसित वाण व तंत्रज्ञान तसेच शेतकरी हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे सहाय्यक कीटकशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर दत्तात्रय पटाईत यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने कापूस, हळद, सोयाबीन आदी पिकांमधील कीड व रोग व्यवस्थापन, खत व्यवस्थापन तसेच कापूस पिकामध्ये फवारणी करताना येणाऱ्या अडचणी याबाबत डॉ. पटाईत यांनी शास्त्रीय पद्धतीने सविस्तर मार्गदर्शन केले.

भेटीदरम्यान शेतकरी गटाने कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रातील प्रदर्शनीस भेट देऊन विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध तंत्रज्ञानाची माहिती घेतली. विद्यापीठाने विकसित केलेल्या तुरीच्या विविध वाणांबाबत माहिती घेतल्यानंतर आपल्या भागात या वाणांची लागवड करण्याचा मनोदय शेतकऱ्यांनी व्यक्त केला. तसेच विद्यापीठाने विकसित केलेले 'बायोमिक्स' हे उत्पादन आपण हळद व इतर फळबागांमध्ये वापरत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

यावेळी शेतकरी गटाचे प्रमुख तथा प्रगतशील शेतकरी श्री. रवींद्र मापारी यांनी सर्व शेतकऱ्यांच्या वतीने विद्यापीठाचे माननीय कुलगुरू तसेच विद्यापीठातील तज्ज्ञांचे आभार व्यक्त केले. चिंचोली, ता. जिंतूर येथील प्रगतशील शेतकरी श्री. किशनराव मोरे यांचीही यावेळी उपस्थिती होती. विद्यापीठातील तज्ज्ञांकडून मिळालेल्या शास्त्रीय, उपयुक्त आणि शेतकरी-केंद्रित मार्गदर्शनाबद्दल शेतकरी गटाने समाधान व्यक्त केले.

## श्री क्षेत्र पंढरपूर येथे एकादशी निमित्त विठ्ठल रुक्माई च्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** श्री क्षेत्र पंढरपूर येथे कामिका एकादशीनिमित्त भाविकांची अलोट गर्दी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील लहाने पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वारकरी संप्रदायातील भाविकांची अलोट गर्दी होते या परिसरातून पायी दिंड्या दुपारी कीर्तन महाप्रसाद परिसरात दुकाना भाविकांनी हा परिसर गजबजून जातो येणाऱ्या भाविकांसाठी संस्थांच्या वतीने पाणी महाप्रसाद भाविकांचे दर्शनासाठी रांगा यासाठी संस्थांचे स्वयम् सेवन मंडळी भाविकांना सुख सुविधा देण्यासाठी पुढाकार घेतात येणाऱ्या भाविकांची दर्शन सुरळीत होण्यासाठी संस्थांचे पदाधिकारी विशेष लक्ष ठेवून भाविकांना सुख सुविधा उपलब्ध करून देतात

## ज्येष्ठ नागरिकांसाठी 'शहरनामा'चा खास हेरिटेज वॉक
# सातारा गावातील खंडोबा मंदिराच्या इतिहासाला उजाळा; तीनशे वर्षे जुन्या दांडेकर वाड्यालाही भेट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सातारा गावातील प्रसिद्ध खंडोबा मंदिराचा इतिहास, मंदिराशी संबंधित आख्यायिका आणि पारंपरिक सणांची माहिती जाणून घेण्याची संधी ज्येष्ठ नागरिक व इतिहासप्रेमींना 'शहरनामा'च्या हेरिटेज वॉकमधून मिळाली. विशेष म्हणजे 'शहरनामा'चा हा चौथा हेरिटेज वॉक खास ज्येष्ठ नागरिकांना समर्पित करण्यात आला होता.

इतिहास व पुरातत्व विभाग, एमजीएम विद्यापीठ, आख्यान फाऊंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्ट, ॲडगाइड मीडिया प्रा. लि. आणि भारत पर्यटन, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने या हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले.

इतिहास अभ्यासक उमेश पटवर्धन आणि पुरातत्वविद आशुतोष पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. हेरिटेज वॉकची सुरुवात खंडोबा मंदिराजवळील दांडेकर वाड्यापासून झाली. यावेळी वर्षा दांडेकर, आशिष दांडेकर आणि संदीप दांडेकर उपस्थित होते. संदीप दांडेकर यांनी वाड्यातील पेशवेकालीन उजव्या सोंडेच्या गणपतीची माहिती दिली.

दांडेकर वाडा सुमारे तीनशे वर्षे जुना असून, येथील गणपतीची सहा पिढ्यांपासून पूजा केली जात असल्याचे संदीप दांडेकर यांनी सांगितले. नारायण दीक्षित यांच्या काळात खंडोबा मंदिर कडेपठारावरील मंदिराशी संबंधित होते. पुढे देवाच्या प्रेरणेने मंदिर




खाली आणण्यात आल्याची आख्यायिका त्यांनी सांगितली. दरवर्षी खंडोबा मंदिरातील प्रतिमा दांडेकर वाड्यात आणून विधिवत पूजा केली जाते आणि त्यानंतर त्या पुन्हा मंदिरात नेल्या जातात.

यानंतर गावातील देखण्या गणपती बारवेला भेट देण्यात आली. त्यानंतर खंडोबा मंदिरात आरती करण्यात आली. उमेश पटवर्धन यांनी दांडेकर वाड्यातील गणपतीची मूर्ती पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या पूजेतील असल्याची माहिती दिली. सध्याचे खंडोबा मंदिर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी सुमारे १७६६च्या आसपास बांधल्याचेही त्यांनी सांगितले. कडेपठारावरील मूळ मंदिराचेही ऐतिहासिक महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

मंदिराचे पुजारी विशाल धुमाळ यांनी खंडोबा मंदिराशी संबंधित विविध आख्यायिका सांगितल्या. मंदिरात खंडोबा व म्हाळसा देवी यांच्या मूर्ती असून, कडेपठारावरील मंदिरात म्हाळसा व बाणाई देवीचे स्थान असल्याचे त्यांनी सांगितले. चंपाषष्ठी, बांगर सट, पौष पौर्णिमा, चैत्र पौर्णिमा आणि कडेपठार यात्रा हे येथील प्रमुख उत्सव असल्याची माहितीही त्यांनी दिली.

हेरिटेज वॉकचा समारोप खंडोबाच्या आख्यानावर आधारित गोंधळाने झाला. जगभरातील पर्यटनस्थळांना भेट देण्याबरोबरच आपल्या शहरातील ऐतिहासिक वारसास्थळेही जाणून घेऊन त्यांचा इतिहास जिवंत ठेवण्याचे आवाहन 'शहरनामा'च्या टीमने केले. खंडोबा मंदिराचा इतिहास जाणून घेताना ज्येष्ठ नागरिकांनीही या वारसा स्थळाचा मनमुराद आनंद घेतला.

यावेळी गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतवणे, रमाकांत रौतल्ले, भारत पर्यटन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी स्नेहल पाटील, एमजीएम विज्ञान केंद्राचे संचालक श्रीनिवास औंधकर, प्रगतशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रमोद भेंडे व त्यांची टीम, राजश्री अग्रवाल, खंडोबा मंदिराचे सचिव साहेबराव पळसकर आणि स्थानिक विजय सोनवणे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक व इतिहासप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'देवा भाऊ क्रीडा महोत्सवा'त 300 विजेत्यांवर पदकांचा वर्षाव; 2500 हून अधिक खेळाडूंचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** क्रीडा विश्वात नवचैतन्य निर्माण करणारा आणि युवा खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा 'देवा भाऊ क्रीडा महोत्सव' उत्साही वातावरणात पार पडला. श्रीवर्धन फाउंडेशनच्या वतीने आयोजित या क्रीडा महोत्सवात शहरासह परिसरातील तब्बल २५०० हून अधिक खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याची चमक दाखविली. महोत्सवाची सांगता भव्य बक्षीस वितरण समारंभाने झाली.

बक्षीस वितरण समारंभास माजी कसोटीपटू इक्बाल सिद्दिकी यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रीवर्धन फाउंडेशनचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते शिरीष बोराळकर, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त डॉ. उदय डोंगरे, डॉ. दिनेश वंजारे, सागर मगरे तसेच श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित




होते.

यावेळी मान्यवरांनी 'देवा भाऊ क्रीडा महोत्सवा'च्या यशस्वी परंपरेचे कौतुक केले. मागील आवृत्तीप्रमाणे यंदाही महोत्सवाला खेळाडूंचा मोठा प्रतिसाद मिळाला. दरवर्षी या स्पर्धेचा विस्तार आणि दर्जा वाढत असून, स्थानिक पातळीवरील गुणवंत खेळाडूंना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरतात, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

स्पर्धेतील विविध क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३०० पेक्षा अधिक विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पदके आणि गुणवत्ता प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. आपल्या कामगिरीची दखल घेतली गेल्याने खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

या सोहळ्यास डॉ. खटावकर, हेमेंद्र पटेल, विक्रम डेकाटे, भिकन आंबे, अरुण गुदगे, विशाल पांडे, अजय शिंदे, निनाद खोचे, हाफिस शेख, हमादे, मंगलताई आसवर, प्रथमेश दुधगावकर यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवर, प्रशिक्षक, पालक आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## युवागायक स्वराज सरकटे यांना 'कलासन्मान पुरस्कार'



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** युवा मित्र फाउंडेशनच्या वतीने मराठवाड्यातील युवा गायक व युवारत्न पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध युवागायक स्वराज सरकटे यांना 'युवा मित्र कलासन्मान पुरस्कार' जाहीर झाला आहे. सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी 'देश मेरा रंगीला' या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संत एकनाथ रंग मंदिर, उस्मानपुरा येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

अल्पावधीतच गायन क्षेत्रात लोकप्रियता मिळविणाऱ्या स्वराज सरकटे यांनी कमी वयात नावलौकिक मिळविला आहे. ते मुंबई येथे पद्मश्री सुरेश वाडकर आणि भजनसम्राट अनुप जलोटा यांच्या मार्गदर्शनाखाली गायनाचे शिक्षण घेत आहेत. विविध नामांकित महोत्सवांमध्ये त्यांनी गायन सादर केले आहे. तसेच 'स्वरराज', 'हीदम संगीत' आणि 'एसपीएस इव्हेंट्स'चे ते संचालक आहेत.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा; महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या क्रांती दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी शहरातील प्रमुख महापुरुषांच्या पुतळ्यांना आणि प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाची अधिकृत सुरुवात क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर संभाजी पेठ येथे महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच मिल कॉर्नर येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास तर टप्पा क्रमांक तीन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. याशिवाय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमांनाही पुष्पहार अर्पण करण्यात आला. या मालिकेत पुढे, विश्वभारती कॉलनी येथील भारत माता मंदिरात जाऊन भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.



या सर्व कार्यक्रमांच्या वेळी महानगरपालिकेचे प्रमुख पदाधिकारी आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, महिला व बालकल्याण समिती सभापती शोभा बुरांडे, प्रभाग समिती सभापती अनिता मानकापे, नगरसेवक चंद्रकांत हिवराळे, नगरसेविका कीर्ती शिंदे, अर्चना नीलकंठ यांच्यासह महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, नगरसेवक नवीन ओबराय, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील, जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद हे उपस्थित होते. याशिवाय महानगरपालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी वर्गही मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. मुख्य कार्यक्रमाव्यतिरिक्त महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांमध्ये देखील संबंधित नगरसेवक आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महापुरुषांच्या पुतळ्यांना व प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. स्थानिक पातळीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करत नागरिकांच्या व प्रशासनाच्या वतीने क्रांती दिन अत्यंत उत्साहात आणि शिस्तीत साजरा करण्यात आला.

# एकजुटीच्या प्रयत्नांनी लक्ष्य गाठले आणि परभणीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला!"

हिंदु प्रकाश वार्ता. प्रतिनिधी

**परभणी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमात परभणी जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेतील संगणकीकरणाचे काम 100 टक्के पूर्ण करणारा परभणी जिल्हा हा मराठवाडा विभागात प्रथम, तर राज्यात तृतीय क्रमांकाचा जिल्हा ठरला आहे.

पावसाळ्याच्या प्रतिकूल परिस्थितीतही अधिकारी, कर्मचारी आणि बीएलओ यांच्या अथक परिश्रमातून ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली आहे.

या यशामागे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. संजयसिंह चव्हाण यांचे प्रभावी नियोजन, सातत्यपूर्ण पर्यवेक्षण, नियमित आढावा आणि मार्गदर्शन निर्णायक ठरले. जिल्ह्यातील एसआयआर प्रक्रियेला अपेक्षित गती मिळावी आणि निर्धारित उद्दिष्ट वेळेत साध्य व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी यांनी दररोज सायंकाळी ७ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांचा वैयक्तिकरीत्या आढावा घेतला. विधानसभा मतदारसंघनिहाय प्रगती, प्रलंबित कामकाज, तांत्रिक अडचणी तसेच अपेक्षित कार्यवाही याबाबत या बैठकीमध्ये सविस्तर आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

या सातत्यपूर्ण आणि परिणामाभिमुख पर्यवेक्षणाला सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आपल्या कार्यक्षेत्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांशी प्रभावी समन्वय साधला आणि कामाला अपेक्षित गती दिली.

जिल्हास्तरावरून करण्यात आलेल्या या नियमित व वैयक्तिक पर्यवेक्षणामुळे क्षेत्रीय यंत्रणेतील समन्वय अधिक बळकट झाला आणि एसआयआर प्रक्रियेतील संगणकीकरणाचे काम निर्धारित उद्दिष्टानुसार 100 टक्के पूर्ण करण्यास मोठी मदत झाली.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रक्रियेच्या बारकाव्यांबाबत अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे क्षेत्रीय यंत्रणेला एसआयआर प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक बाबी प्रभावीपणे हाताळता आल्या.

क्षेत्रीय स्तरावर उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी उदयसिंह भोसले (परभणी), शैलेश लाहोटी (सेलू), संगीता चव्हाण (पाथरी) आणि जीवराज डापकर (गंगाखेड) यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सूक्ष्म नियोजन, नियमित आढावा आणि प्रभावी समन्वयाच्या माध्यमातून कामाला गती दिली.

विधानसभा मतदारसंघनिहाय प्रलंबित बाबींवर लक्ष केंद्रित करून अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

पावसातही थांबले नाही पाऊल...

एसआयआर प्रक्रियेच्या या यशात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली ती बीएलओ आणि क्षेत्रीय स्तरावरील कर्मचाऱ्यांनी पावसाळ्याचे दिवस, ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थिती, वाहतुकीच्या अडचणी आणि नागरिकांपर्यंत पोहोचण्यातील आव्हाने असतानाही बीएलओ यांनी घरोघरी भेटी देत, नागरिकांशी संवाद साधत आणि आवश्यक माहिती संकलित करत आपली जबाबदारी अत्यंत कर्तव्यनिष्ठेने पार पाडली.

मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल, पोलीस पाटील, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका तसेच इतर विभागांतील क्षेत्रीय कर्मचारी यांनीही या मोहिमेत मोलाची साथ दिली. "निवडणूक ही केवळ निवडणूक विभागाची जबाबदारी नसून ती लोकशाहीची सामूहिक जबाबदारी आहे", या भावनेतून विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांनी एसआयआर मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला.

तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच तहसील कार्यालयातील निवडणूक विषयक कामकाजाची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही नियमित कामकाजासोबत एसआयआर प्रक्रियेला प्राधान्य दिले. वेळेची तमा न बाळगता, सुट्ट्या व कार्यालयीन वेळेच्या पलीकडेही काम करत या मोहिमेला अपेक्षित गती देण्यात आली.

सामूहिक प्रयत्नांना यशाची मोहोर

परभणी जिल्ह्याची ही कामगिरी कोणत्याही एका अधिकारी किंवा विभागाची नसून जिल्हा प्रशासन, निवडणूक यंत्रणा, महसूल यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी, विविध क्षेत्रीय कर्मचारी आणि हजारो बीएलओ यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे.

विशेष सखोल पुनरिक्षणाच्या माध्यमातून मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने परभणी जिल्ह्याने केलेली ही कामगिरी निश्चितच उल्लेखनीय आहे.

मराठवाड्यात प्रथम आणि राज्यात तृतीय क्रमांकाचे स्थान मिळवत परभणी जिल्ह्याने पुन्हा एकदा नियोजन, समन्वय आणि टीमवर्कच्या बळावर उल्लेखनीय कामगिरी करण्याची आपली क्षमता सिद्ध केली आहे.

# सोयगाव पोलिसांनी आत्महत्येचा बनाव रचून केलेल्या खुनाचा केला उलगडा; दोन आरोपी अटक

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.९ ऑगस्ट :** पोलीस स्टेशन सोयगाव अंतर्गत बनोटी दूरक्षेत्र येथे दि. 19/07/2026 रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र,बनोटी येथून प्राप्त झालेल्या MLC वरून गोपाळ शामराव बोरसे,रा. बनोटी हा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृत आढळून आल्याने सदर प्रकरणी अकस्मात मृत्यू क्र.13/2026, कलम 194 BNSS प्रमाणे नोंद करण्यात आली होती.

सदर प्रकरणात वैद्यकीय अधिकाऱ्यांचा PM Report व इतर कागदपत्रांची पाहणी केली असता मृत्यू हा गळफासामुळे नसून गळा आवळल्यामुळे झाल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर चौकशी अंमलदार पोहेकॉ. राजेंद्र बर्डे यांनी मयताचा अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून खून केल्याबाबत तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन सोयगाव येथे दिनांक 07/08/2026 रोजी गु.र.नं. 186/2026, कलम 103(1) BNS प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

अत्यंत कौशल्याने रचलेला आत्महत्येचा बनाव

सदर प्रकरणातील आरोपींनी खुनानंतर मृतदेहास त्याच्या राहत्या घराच्या पाठीमागील पत्र्याच्या रूममधील लोखंडी अँगलला लटकवून गोपाळ बोरसे याने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचा बनाव अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने रचला होता.त्यामुळे सुरुवातीला सदर प्रकरण हे आत्महत्येचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत होते.

मात्र,सोयगाव पोलिसांनी केवळ घटनास्थळावरील परिस्थितीवर अवलंबून न राहता वैद्यकीय पुरावे, घटनास्थळावरील परिस्थिती,साक्षीदारांचे जबाब,तांत्रिक विश्लेषण तसेच घटनेच्या रात्रीच्या हालचालींचा कालानुक्रमाने केलेला तपास सुरू केला.

छत्रपती संभाजीनगर पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सिल्लोड उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत काईंगडे यांनी स्वतः पोलीस स्टेशन सोयगाव येथे उपस्थित राहून तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे व तपास पथकास आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले.

तपासादरम्यान मयताची पत्नी ज्योती गोपाळ बोरसे,(वय 33 वर्षे) रा.साठेनगर,बनोटी हिची विश्वासात घेऊन सखोल विचारपूस करण्यात आली.



तसेच तिचा मित्र असल्याचे तपासात निष्पन्न झालेला गणेश वसंत शिंदे,(वय 35 वर्षे) रा.श्रीरामनगर,बनोटी याच्याबाबतही तांत्रिक व परिस्थितीजन्य पुरावे तपासण्यात आले.

तपासामध्ये दोघांमधील कॉल्सची वारंवारता,कॉलचे दीर्घ कालावधी,रात्री उशिरापर्यंत व पहाटे झालेला संपर्क तसेच घटनेच्या आसपासच्या कालावधीतील त्यांच्या हालचालींचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. त्याचबरोबर नातेवाईक व साक्षीदारांकडून मिळालेल्या माहितीची तांत्रिक पुराव्यांशी पडताळणी करण्यात आली.

घटनेच्या रात्री मिनिट-टू-मिनिट घडलेल्या घटनांची सांगड घालताना अनेक बाबींमध्ये विसंगती आढळून आल्या. पोलिसांनी या सर्व बाबींचा एकत्रितपणे सखोल अभ्यास केल्याने आरोपींनी रचलेल्या आत्महत्येच्या बनावातील त्रुटी समोर आल्या. तपासातून मयताची पत्नी ज्योती बोरसे व गणेश शिंदे यांनी संगनमताने मयत गोपाळ बोरसे याचा गळा आवळून खून केला व त्यानंतर मृतदेहास लोखंडी अँगलला लटकवून त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा बनाव केला, असे निष्पन्न झाले.

या प्रकरणात दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना मा. न्यायालयासमोर हजर केले असता दि. 11 ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे.

तपास पथकाची उल्लेखनीय कामगिरी

सदरची कामगिरी छत्रपती संभाजीनगर पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव,अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली,सिल्लोड उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत काईंगडे यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन सोयगाव येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे,पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,पोहेको. राजेंद्र बर्डे,पोको.नारायण खोडे,गजानन दांडगे,संजय सिंगल,सदीक तडवी,मपोको. माधुरी लोखंडे व इतर पोलीस अंमलदारांनी केली आहे.

आरोपींनी खुनानंतर आत्महत्येचा बनाव इतक्या कौशल्याने रचला होता की,सुरुवातीला संपूर्ण घटना आत्महत्येसारखी भासत होती. मात्र, सोयगाव पोलिसांनी वैद्यकीय पुराव्यांपासून सुरुवात करून प्रत्येक उपलब्ध पुराव्याची बारकाईने तपासणी केली.नातेवाईक व साक्षीदारांची सखोल विचारपूस,तांत्रिक विश्लेषण आणि घटनेच्या रात्रीच्या घटनाक्रमाचे मिनिट-टू-मिनिट विश्लेषण करून आरोपींच्या बनावातील विसंगती शोधून काढल्या.

पोलीसांच्या चातुर्यपूर्ण तपासामुळे व अथक परिश्रमामुळे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने रचलेला आत्महत्येचा बनाव उघडकीस आणून गंभीर खुनाच्या गुन्ह्याचा यशस्वीपणे उलगडा करण्यात आला.


मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911